# सृष्टिज्ञान

**संस्थापक :**
कै.प्राचार्य गो. रा. परांजपे
कै. डॉ. दि. धों. कर्वे
कै. प्रा. स. बा. हुदलीकर

**मार्गदर्शक :**
डॉ. रघुनाथ माशेलकर
डॉ. अनिल काकोडकर
डॉ. विजय भटकर
डॉ. शेखर मांडे

**सल्लागार :**
ले. ज. डॉ. माधुरी कानिटकर (निवृत्त)
डॉ. भूषण पटवर्धन

**संचालक :**
डॉ. योगेश शौचे
डॉ. मानसी माळगांवकर
डॉ. क. कृ. क्षीरसागर
श्री. र. वि. कुलकर्णी

**संपादक :** रमेश दाते
**सहसंपादक :**
डॉ. प्रभाकर इंगळे, सत्यजित जोशी
**मुखपृष्ठ मांडणी व सजावट :**
मिलिंद जोशी, अनुपम क्रिएशन्स, पुणे

या अंकाची किंमत : रु. ५०.००
वार्षिक वर्गणी : रु. ५००.००

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
'सृष्टिज्ञान', c/o विज्ञान भारती
काशी निवास, सुभाषनगर गल्ली क्र.६,
१२६१ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.
फोन नं.: ०२०–२४४७४२९५
ई–मेल : sci.vibha@gmail.com

या अंकातील लेख त्या त्या विषयांतील तज्ज्ञांनी लिहिलेले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# भविष्यातील भूकनिवारण

मानवाने कितीही भौतिक प्रगती केली तरी प्रत्येकास दिवसातून किमान दोन वेळातरी जे अन्न खावे लागते त्याला दुसरा पर्याय नाही. अन्न सुरक्षा मिळविणे हे एक मोठे लक्ष बनले आहे. भारतात कृषी उत्पादन सातत्याने वाढत असल्याने केंद्र सरकारने गरिबांसाठी विविध योजना आखल्या असल्यामुळे ही समस्या आपल्याला सध्या जाणवत नाही. मात्र कृषी उत्पादनातील वार्षिक वाढ व लोकसंख्यावाढ यांचे गणित लवकर सुटण्यासारखे नाही. जागतिक स्तरावर ही समस्या मोठ्या प्रमाणावर जाणवू लागली आहे. आधी अन्नाची कमतरता व त्यानंतर पौष्टिक आहाराची कमतरता या भावी काळातील प्रमुख समस्या आहेत. जगाची लोकसंख्या यावर्षी आठ अब्जांवर पोहोचली आहे. त्यातच शेतकरी संख्या दिवसेंदिवस घटत आहे. खेड्यातील शेतकऱ्यांच्या तरुण पिढीला शेती सोडून शहरात येण्याचे वेड लागले आहे. तर दुसरीकडे जनुकीय संस्कारीत अन्न यासारख्या नाविन्यपूर्ण कल्पनांचे दुष्परिणाम आता दिसू लागले आहेत. म्हणून यावर ''कीटक'' हे भावी अन्न होऊ शकते का? याचा वेध घेण्याची वेळ आता आली आहे. ही कल्पना आकर्षक/अनिवार्य की आवश्यक यावर वाचकांनीच विचार करून प्रतिक्रिया आम्हास जरूर कळवा.

इस्रोची यान दौड कौतुकास्पदरित्या सुरू आहे. भारताची अंतराळातील वेध शाळा (एक्स्पोसॅट) हे एक मोठेच पुढचे पाऊल आहे. मानवाची जिज्ञासा व कूतूहल मोठे अजब रहस्यमय रसायन आहे. विश्वातील रहस्ये शोधण्याच्या प्रयत्नांना महत्व आहेच. कदाचित पोट भरल्यानंतर निसर्ग जाणण्याची ओढ ही दुसरी महत्वाची प्रवृत्ती असावी. किंबहूना यालाच दुसरी भूक असेही म्हणता येईल. ही भूक निभावणे यात सृष्टिज्ञान खारीचा वाटा उचलण्याचा प्रयत्न करित आहेत.

यालाच अनुसरून संशोधन संस्थांचा परिचय हे सदर आपण चालू केले आहे. या अंकात सुक्ष्मजीव शास्त्र व रसायन शास्त्र या शाखांमध्ये भारतीय पारंपारिक ज्ञान शाखांच्या अनुषंगाने होणाऱ्या संशोधनाची माहिती ''भिडे फाऊंडेशन'' या सदरात वाचायला मिळेल. त्यातील जैविक घड्याळ सर्वांनीच समजावून घेणे आवश्यक आहे. शारिरीक

SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973)
"Srishtidnyan" Monthly magezine owned by Vidnyan Bharati, Pune, Printed and published by Ramesh Date. Printed at Pratima Mudran, Kothrud Industrial Area, Kothrud, Pune - 411038. Published at 1261, Shukrawar Peth, Subhashnagar, Pune - 411002.
Editor - Ramesh Date

घड्याळ व पृथ्वीच्या गतीने जाणवणारे काल घड्याळ यात ताळमेळ असणे अत्यंत महत्वाचे आहे. आरोग्याच्या समस्यांपासून बचाव करण्यासाठी ते आवश्यक आहे.

खरेतर मार्च महिन्याचा अंक हा महिला वैज्ञानिकांविषयी विशेष माहितीपूर्ण लेख असलेला असतो. या अंकात मात्र त्याची केवळ झलक आहे. काही तांत्रिक कारणामुळे महिला शास्त्रज्ञांवरील लेख एप्रिल महिन्याच्या अंकात घ्यावे लागत आहेत.

आयुर्वेद ही भारताने जगाला दिलेली मौल्यवान भेट आहे. ''आयुर्वेदोक्त अग्नि व आहार'' या लेखात आहारामुळे निर्माण होणाऱ्या उष्णतेची तसेच अन्न पचविण्यासाठी लागणाऱ्या अग्नि तत्वासंबंधी उपयुक्त माहिती थोडक्यात दिली आहे. अन्न सेवन व पचन ही शरीर आरोग्यमय राखण्यासाठी अत्यंत आवश्यक बाब आहे. आपला पारंपारिक आहार हा मुलतःच सर्व समावेषक आहार आहे व सुदृढ पिढी घडविणारा आहे. त्याकडे पाठ फिरविण्याची प्रवृत्ती सध्या दिसून येत असली तरी, लवकरच आपले डोळे उघडतील अशी आशा करुयात.

''जैववैविध्य'' हे विश्वातील ज्ञात असलेल्या एकमेव म्हणजेच पृथ्वीवरील जीवसृष्टीचा आधार व वैशिष्ठ्य आहे. पृथ्वीचे मूळनाव आहे वसुंधरा. वसु म्हणजे संपत्ती–जैविक संपत्ती तसेच भौतिक संपत्ती. ''नाना रत्ना वसुंधरा'' म्हणजे नानाप्रकारची, अनेकप्रकारची रत्न संपत्ती असणारी ती वसुंधरा. वसुंधरेच्या निर्मितीपासून ते आजवरच्या कालखंडात तिच्या रुपात वारंवार अनेक बदल घडत आहेत. अजैविक बदल महत्वाचे आहेतच परंतू तेही घडवून आणण्यात जीवसृष्टीचा महत्वाचा सहभाग आहे, हे नीट ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. उदा.– जीवसृष्टीच्या प्रारंभी पृथ्वीवरील प्राणवायुचे प्रमाण अत्यल्प होते. ते जीवसृष्टीचा विकास होण्यास प्रतिबंध करणारे होते. म्हणूनच काय की सजिवांनीच प्राणवायूचे प्रमाण वाढवले आहे असे आढळते. या कारणाकरता ''जैववैविध्य'' हे सदर समजावून घेतले पाहिजे. त्यातून पर्यावरण व जीवसृष्टी यांचा असलेला अतूट संबंध लक्षात येईल.

विज्ञान व तंत्रज्ञान ही मानवाच्या प्रगती रथाची दोन चाके आहेत. बऱ्याच वेळेला विज्ञान व तंत्रज्ञान यांची प्रगती हातात हात घालून झालेली दिसते. तसेच काहीसे गेल्या शतकात घडले होते. प्रा. गो. रा. परंजपे हे विज्ञान पंढरीचे वारकरी तर प्रभाकर देवधर हे तंत्रज्ञानाचे पाईक. दोघांचेही स्मरण ठेवणे विज्ञान प्रेमींचे कर्तव्य आहे. सृष्टिज्ञानतर्फे दोघांनाही भावपूर्ण आदरांजली.

या सर्वांविषयीच्या आपल्या प्रतिक्रिया जरुर कळवा.

**– रमेश दाते**
sci.vibha@gmail.com

**निवेदन**

सृष्टिज्ञान च्या वर्गणी संदर्भात. गेली ५ वर्षे, सृष्टिज्ञान ची वार्षिक वर्गणी ४००/– आहे. मासिक निर्मितीतील सततच्या वाढत्या खर्चामुळे, सृष्टिज्ञान मासिकाची वार्षिक वर्गणी ५००/–रू. करण्यात येत आहे. द्विवार्षिक वर्गणी १०००/– रू. राहील.

पोस्टाने अंक वेळेत मिळत नसल्याचे निदर्शनास आल्याने, कूरियर चा पर्याय ठेवावा लागत आहे. ज्यांना कूरियरने अंक हवा आहे, त्यांचेसाठी दरवर्षी ३५०/–रू. ज्यादा आकारले जातील. कूरियर खर्चासह वार्षिक वर्गणी ८५०/– रू असेल.

नाईलाजाने घेत असलेल्या या निर्णयाला सर्व वर्गणीदारांनी सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973)
'सृष्टिज्ञान' हे मासिक मालक विज्ञान भारती पुणे यांचे साठी मुद्रक व प्रकाशक रमेश दाते यांनी प्रतिमा मुद्रण, कोथरुड इंडस्ट्रियल एरिया, कोथरुड, पुणे ४११०३८ येथे छापून विज्ञान भारती १२६१ शुक्रवार पेठ, काशी निवास, सुभाषनगर, गल्ली क्र.६, पुणे ४११००२ येथे प्रसिध्द केले.
संपादक : रमेश दाते